# महाराष्ट्र सोशल हाउसिंग अँड ॲक्शन लीग

Maharashtra Social Housing and Action League

MASHAL

**वार्षिक अहवाल एप्रिल २०२१ – मार्च २०२२**

## अनुक्रमणिका


अध्यक्षीय मनोगत……………………………………………………………………………2

राबविण्यात आलेले प्रकल्प

मॅपिंगचे उपक्रम:

1. स्लम अ‍ॅटलास २.० (झोपडपट्ट्यांच्या नकाशांचे पुस्तक)……………………………………...3

हवामान बदलासंदर्भातील उपक्रम:

2. सी-बॅलन्स –थर्मल कम्फर्ट प्रकल्प …………………………………………………5
3. पंढरपूर वारीच्या मार्गांवरील गावांतील उपक्रम…………………………………………6

सामाजिक विकास:

4. CORE लसीकरण मोहीम ……………………………………………………………8
5. कोविड मदत कार्य २.० ……………………………………………………………8
6. ग्लोबल ऑपोर्च्युनिटी युथ नेटवर्क (GOYN)………………………………………..9
7. गृहनिर्माण सहाय्य सेवा……………………………………………………………9
8. उपजीविका प्रकल्प………………………………………………………………..10
9. सर्वांगीण विकासासाठी समृद्धी प्रकल्प………………………………………………10

शासकीय कार्यक्रम आणि विशेषाधिकार:

10. हकदर्शक एम्पॉवरमेंट सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड…………………………………...12
11. PMAY-G (प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण)……………………………………12
12. तृतीयपंथीयांचे सक्षमीकरण…………………………………………………………13

इंटर्नशिप्स……………………………………………………………………………14

संस्थात्मक संरचना……………………………………………………………………15

व्यवस्थापकीय समिती…………………………………………………………………15

अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल………………………………………………………16

श्रद्धांजली……………………………………………………………………………...16

वर्तमानपत्रांतील प्रसिद्धी……………………………………………………………...17

‘मशाल’ संबंधी……………………………………………………………………...18

## अध्यक्षीय मनोगत

एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ या वार्षिक अहवालाच्या निमित्ताने मशालच्या व्यवस्थापकीय मंडळाच्या वतीने आमचे शुभचिंतक, लाभार्थी, विविध प्रकल्पांतील भागीदार, सहयोगी तसेच देणगीदार यांना आम्ही आश्वस्त करू इच्छितो की मशालच्या संस्थापक सदस्यांनी संस्थेच्या तत्वांमध्ये निहित केलेल्या ध्येयाशी आणि दूरदृष्टीशी आम्ही एकनिष्ठ आहोत. संस्थेचे उपाध्यक्ष तसेच संस्थापक सदस्य श्री. अशोक कुलकर्णी व श्री. शरद महाजन, कार्यकारी संचालक यांच्या यावर्षी झालेल्या अचानक व अकाली निधनामुळे वैचारिक पोकळी निर्माण झाल्याने आम्हाला सर्वच प्रकल्पांच्या आघाड्यांवर काही काळासाठी अनिश्चिततेचा सामना करावा लागला. या कठीण प्रसंगी संस्थेचे विश्वासार्ह व चिंतनशील व्यवस्थापकीय मंडळ आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आणि याच पाठिंब्यामुळे संस्था आपल्या देणगीदार तसेच समर्थकांना दिलेल्या आश्वासनांवर तसेच बांधिलकीवर अविचल राहू शकली.

या वर्षी संस्थेने पुन्हा एकदा गरीब, असुरक्षित आणि झोपडपट्टीवासियांना आपल्या कामाच्या केंद्रस्थानी ठेवले. त्याचाच एक भाग म्हणून संस्थेने CORE (अमेरिकास्थित विशेषतः आणीबाणीच्या काळात मदत करणारी संस्था), पुणे महानगरपालिका आणि मिलिंद देवरा फाउंडेशन यांच्या सहयोगाने  कोव्हिड लसीकरण प्रबोधनाचा पथदर्शी उपक्रम राबविला. याअंतर्गत कोव्हिडअनुरूप वर्तनाचा प्रचार करणे, कोव्हिड तपासणी सामग्री वाटप करणे आणि हडपसर वॉर्डमधील ३६ झोपडपट्ट्यांतील १०,००० कुटुंबांना कोव्हिड लसीकरण मोहीमेसाठी चालना देणे हे कार्यक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आले. मोठ्या प्रमाणावर वाचल्या जाणाऱ्या अनुभव प्रकाशनातर्फे प्रकाशित होणाऱ्या 'सलाम पुणे' या मासिकाने त्यांचा जून २०२२चा अंक या उपक्रमाला समर्पित केला होता. या अंकाच्या दहा ते बारा हजार प्रति पुण्यातील झोपडपट्ट्यांमध्ये वितरीत करण्यात आल्या. याव्यतिरिक्त या उपक्रमाची माहिती फेसबुक, युट्युब व ट्विटर सारख्या समाजमाध्यमांच्या व्यासपीठांवर देखील प्रसिद्ध करण्यात आली. गरीब व उपेक्षित समूहांसाठी स्थानिक प्रशासकीय व सहयोगी संस्थांना महामारीचे उत्तम प्रकारे व्यवस्थापन करण्यास सक्षम करणे व त्यासाठी एक प्रभावी प्रारूप तयार करणे हा या उपक्रमाचा हेतू होता. सदर हेतू यशस्वीरीत्या साध्य झाल्याचे दिसून आले.

जिओग्राफिकल इन्फोर्मेशन सिस्टीम (GIS) आधारित बायोमेट्रिक आर्थिक सर्वेक्षणांच्या वापराबाबत मशाल आघाडीवर आहे. यावर्षी आम्ही स्लम ॲटलासची पहिली आवृत्ती अपग्रेड केली आहे. स्लम ॲटलासच्या दुसऱ्या आवृत्तीमधील डेटा अधिक गतीने आणि अचूकने गोळा व्हावा यासाठी अत्याधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. समुदायांचे अपग्रेडेशन, विस्थापन व पुनर्वसन यांसाठी स्लम ॲटलासच्या नव्या आवृत्तीचा उपयोग होईल. याचे इतरही उपयोग आहेत, जसे की, देशातील शहरांची माहिती व विविध समूहांच्या विकासाचे प्रारूप यांसंबंधीचे ज्ञान बळकट करणे; सीएसआर, शासकीय तसेच इतर निधी उपलब्ध करून देणाऱ्या द्विपक्षीय संस्थांच्या कामकाजावर देखरेख ठेवणे इ.

वरील दोन महत्वाच्या उपक्रमांव्यतिरिक्त, पंढरपूरच्या वारीचे देहू-पंढरपूर व आळंदी-पंढरपूर या रस्त्यांवरील नियोजन तसेच वारीचा सामाजिक व पर्यावरणीय पैलू अभ्यासण्याचे कार्य संस्थेमार्फत तज्ञ व्यक्तींच्या सहाय्याने गेले वर्षभर सुरु आहे. या कार्याची दखल प्रशासकीय पातळीवरही घेण्यात आली आहे.

तापमान बदलाच्या क्षेत्रात भरीव कार्य करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून मशालने इनफॉर्मल हाउसिंग थर्मल प्रकल्पासाठी प्रत्यक्ष क्षेत्रीय पातळीवरील सहाय्य म्हणून काही छतांचे व भिंतींचे डिझाईन पुरवले.

उत्साही क्षेत्र अभ्यासकांचा गट, मुख्य प्रवाहातील रोजगाराच्या संधी नाकारून आमच्यासोबत कार्यरत असणारे विविध क्षेत्रांतील पारंगत तरुण-तरुणी, आमच्या व्यवस्थापकीय समितीचे खंबीर व निष्ठावान सदस्य आणि आमच्यावर विश्वास टाकून आम्हाला नाविन्यपूर्ण प्रकल्पांसाठी प्रसंगी रुळलेली वाट सोडून नाविन्यपूर्ण काम व्हावे यासाठी निधी उपलब्ध करून देणारे हितचिंतक हे सर्व आमची ताकद आहेत. या सर्वांच्या बळावर अर्थपूर्ण व भरीव काम करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असूच. आमच्या प्रयत्नांना यश लाभावे यासाठी आमची संसाधने निरंतर वृद्धिंगत होत राहोत आणि त्यासाठी तुमचा पाठींबा कायम मिळत राहो अशी आम्ही आशा करतो.

# राबविण्यात आलेले प्रकल्प

## स्लम ॲटलास २.० (झोपडपट्ट्यांच्या नकाशांचे पुस्तक)


सदर प्रकल्प म्हणजे मशालतर्फे २००७ ते २०११ या कालावधीत राबविण्यात आलेल्या स्लम ॲटलास प्रकल्पाचाच पुढील भाग आहे. हवाई छायाचित्रणासाठी ड्रोनचा वापर करून सर्व झोपडपट्ट्यांचे मॅपिंग आणि सर्वेक्षण अधिक अचूक करण्यात आले आहे.


अभ्यासले गेलेले प्रशासकीय प्रभाग: 18

झोपडपट्टी वस्त्यांची संख्या: 485

झोपडपट्ट्यांचे एकूण क्षेत्रफळ: 57, 35,511

एकूण लोकसंख्या: 12,59,216




**खालीलप्रकारची माहिती संकलित व विश्लेषित केली गेली:**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| झोपडपट्टी क्रमांक | मजले | कुटुंबप्रमुखाचे नाव | घर / दुकान | स्वतंत्र संडास | स्वतंत्र नळजोड |
| स्वतंत्र गॅसकनेक्शन | गॅसकनेक्शन | आधार कार्ड | रेशनकार्ड | मोबाईल क्रमांक | टिप्पणी |

**किष्किंधानगर झोपडपट्टीचे ड्रोनमार्फत घेतलेले छायाचित्र**



**स्लम ॲटलास 2.0 चे योगदानकर्ते**

| संस्था | योगदान (रु.) |
|---|---|
| **MASHAL** | 7.5 लाख |
| **SPARC** | 5 लाख |
| **Pune Lighthouse** | 5 लाख |
| **Yardi CSR** | 30 लाख |
| **TOTAL** | 47.5 लाख |

सदर प्रकल्प Yardi Software India Private Limited यांच्या सहयोगाने राबविण्यात आला. प्रकल्पाची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे होती:

1. पुणे शहरातील ठराविक झोपडपट्टी वस्त्यांचे ड्रोन तंत्रज्ञान वापरून मॅपिंग (नकाशा काढणे) व सर्वेक्षण करणे.
2. Autocad व GIS सॉफ्टवेअर वापरून अंतिम नकाशा तयार करणे.
3. प्रकल्पातील संकलित माहिती इतर स्वयंसेवी तसेच शासकीय संस्थांना सुलभरित्या मिळावी यासाठी प्रणाली तयार करणे.

शासन, अर्बन लोकल बॉडीज्, स्वयंसेवी संस्था आणि झोपडपट्टीवासियांसाठी स्लम ॲटलास 2.0 खालीलप्रमाणे उपयुक्त ठरणार आहे:

1. कर संकलन करणे आणि झोपडपट्टीवासियांना विविध सेवा पुरवणे
2. पुणे महानगर पालिकेसाठी नोंदण्या तयार करणे
3. झोपडपट्ट्यांचे नकाशे काढणे व सर्वेक्षण करणे
4. झोपडपट्ट्यांमधील परिस्थितीचे विश्लेषण करणे
5. लघुवित्तसंस्थांकडून कर्ज घ्यावे लागेल अशा व्यक्ती हेरणे
6. झोपडपट्टीवासियांच्या उत्थानासाठी आवश्यक माहिती स्वयंसेवी संस्थांना पुरवणे
7. कोणत्याही प्रकारच्या आपत्तीस कमीत कमी जोखीम उचलून सामोरे जाणे

माजी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण स्लम ॲटलास 1.0 चे प्रकाशन करताना

स्लम ॲटलासने शहरातील झोपडपट्टीवासियांची स्थानिक आणि लोकसंख्याशास्त्रीय तपशीलवार माहिती स्मार्ट सिटीच्या अधिकाऱ्यांना दिली



स्लम ॲटलास हे स्मार्ट सिटी मिशनअंतर्गत सुरु करण्यात आलेल्या लाईटहाउस प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठीचे एक महत्वाचे साधन आहे

**मशालने पुण्यात स्मार्ट सिटी सर्वेक्षण केले आणि त्याचाअहवाल स्मार्ट सिटी बुकच्या स्वरुपात प्रकाशित केला**

**ध्येय**

स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या व्यापक परिप्रेक्ष्यात पुणे शहराच्या स्मार्ट सिटी प्रकल्प प्रस्तावाचा आणि त्या दिशेने आत्तापर्यंत झालेल्या वाटचालीचा मागोवा घेणे.
पुण्याच्या स्मार्ट सिटी प्रकल्पाचे नागरिकांनी केलेले मूल्यांकन सादर करणे.
शहरीकरणाचा अनुभव आणि स्मार्ट शहरीकरणाला आवश्यक असलेले दिशादर्शन या व्यापक मुद्द्यांची मजबूत समज विकसित करणारे स्मार्ट सिटी धोरणाचे बहुमूल्य दृष्टीकोन एकत्र आणणे.

**उद्देश**

प्रकल्पाच्या अंमलबजावणीवर माहितीपूर्ण चर्चेसाठी आधार सादर करणे आणि भागधारक, धोरण निर्माते, अंमलबजावणीमध्ये व्यस्त असलेल्या एजन्सीज्, लाभार्थी तसेच स्वतः नागरिक यांना एकत्र आणणे जेणेकरून काय साध्य झाले आहे, काय साध्य करणे आवश्यक आहे आणि महत्वाचे म्हणजे आपण भविष्यातील शहराबद्दल बोलत असल्यास कोणकोणत्या प्रकारच्या कल्पना करणे आवश्यक आहे यावर एकत्रितपणे संभाषण शक्य होईल.

**पुण्यातील झोपडपट्टीवासियांच्या घरांची परिस्थिती सुधारण्याबाबत मशालने मुख्यमंत्री कार्यालयाला एक सादरीकरणदेखील केले**

## सी बॅलन्स – थर्मल कम्फर्ट प्रोजेक्ट

सी बॅलन्स सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड हा एक पर्याप्तता आणि सामाजिक समानतेसाठी वाहून घेतलेला ज्ञान केंद्रित सामाजिक उपक्रम आहे. कार्बन फूटप्रिंट्स कमी करण्यासाठी साधने तयार करणे आणि हवामान बदलासंदर्भात निर्माण होणाऱ्या आणीबाणीच्या प्रसंगांना तोंड देण्यासाठी त्यासंदर्भातील ज्ञान व कृती यांच्यातील तफावत कमी करणे हे या उपक्रमाचे उद्देश आहेत.

*Alufoil/ Bubble Wrap*




*Green Roof System*



*Water-filled PET-bottles*



*Dormer Window*



*Wood Wool Panel*



सामाजिक व आर्थिकदृष्ट्या वंचित वस्त्यांतील घरांमधील उष्णता कमी करण्यासाठी प्रस्तावित केलेली काही डिझाइन्स

नियमबाह्य वस्त्यांमध्ये राहणारे आणि मानवनिर्मित हवामान बदलांची थेट झळ बसणाऱ्या समुदायांच्या सहयोगातून तसेच इतर भागधारकांच्या पाठिंब्याने, थर्मल कम्फर्ट साधत, वातावरणातील बदलांशी जुळवून घेणे हा 'द इन्फॉर्मल हाउसिंग थर्मल कम्फर्ट प्रोजेक्ट'चा मुख्य हेतू आहे.


यातील लाभार्थ्यांसाठी 'मशाल'ने कार्यशाळा आयोजित केल्या. कार्यशाळेसाठी हडपसर येथील शिंदे वस्तीतून ३५ लाभार्थ्यांची निवड केली गेली. अतिउष्णतेमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी सी बॅलन्स सोल्युशन्स प्रा. लि. या संस्थेने केलेल्या संशोधनाबरोबरच संस्थेच्या, वातावरणातील बदलांशी तसेच वाढत्या उष्णतेशी कसे जुळवून घेता येईल यासंदर्भातील कार्याविषयीची माहिती लाभार्थ्यांना देण्यात आली. लाभार्थ्यांना उन्हाळ्यात डोकेदुखी, उलट्या, भोवळ येणे, पुरळ उठणे आणि फोड येणे अशा शारीरिक समस्यांना तर पावसाळ्यात छत गळणे, पाणी साठणे किंवा तुंबणे तसेच विविध प्रकारच्या किड्यांचा प्रादुर्भाव अशा समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यानंतर त्यांना सी बॅलन्सने तयार केलेल्या छप्पराच्या डिसाईनमुळे घरातील उष्णता कशी कमी होते ते समजावून सांगितले तसेच या प्रकारचे छप्पर सुरुवातीला फक्त पाचच घरांवर बसविण्यात येणार असून त्या घरांतील तापमानाची नियमित नोंद ठेवण्यात येणार आहे हेदेखील कळवले गेले. गरज भासल्यास या छप्परांच्या डिसाईनमध्ये आवश्यक ते बदल केले जातील आणि ती घरावर बसविण्याधी लाभार्थ्यांशी सल्लामसलत केली जाईल असे आश्वासन त्यांना देण्यात आले.

## पंढरपूर वारीच्या मार्गांवरील गावांतील उपक्रम

महाराष्ट्रातील प्राचीन संप्रदायांपैकी एक म्हणजे 'वारकरी संप्रदाय'. हा संप्रदाय दरवर्षी होणाऱ्या पंढरीच्या वारीच्या नावाने ओळखला जातो. वारी म्हणजे पंढरपूरच्या विठ्ठलास आषाढी एकादशीच्या दिवशी भेटण्यासाठी पायी केलेली यात्रा. हजारो वारकरी संतांच्या पादुका पालखीत घालून त्यांसोबत पंढरीला अभंग गात नाचत-चालत जातात. या प्रवासाला पालखी सोहळा असेदेखील म्हणतात. सांप्रदायिक संतांच्या पादुका असलेल्या पालख्या महाराष्ट्रातील काना-कोपऱ्यातून या सोहळ्यात सहभागी होतात. त्यांपैकी संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा आळंदीहून तर संत तुकाराम महाराज पालखी सोहळा देहूहून सुरु होतो. आळंदी-पंढरपूर आणि देहू-पंढरपूर या पालखी मार्गांचे रुंदीकरण राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने याआधीच सुरु केले आहे.


पालखी सोहळा व्यवस्थित पार पडावा यासाठी राज्यातील विविध शासकीय खाती तसेच स्थानिक स्वराज्य संस्था कार्यरत असतातच. तरीही, पारंपारिक मूल्यांच्या संवर्धनाद्वारे जनसामन्यांच्या मालकीची, समाजाला सक्षम, सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरणीय बांधणीकडे नेणारी वारीची कुशल प्रशासनासाठी राबणाऱ्या प्रशासकीय यंत्रणांची मोट बांधण्याची निकड आहे.


याच संदर्भात पालखी मार्गांवर भेडसावणाऱ्या प्रशासकीय व इतर स्वरूपाच्या समस्या आणि पालखी मार्गांवरील स्थानिक गावांतील समुदाय, संस्थेचे विविध भागधारक तसेच शासकीय संस्था यांच्या एकत्रित सहयोगाने या समस्यांचे योग्य निराकरण कसे करता येईल याविषयी मशालचे संशोधन सुरु आहे. याच संशोधनाचा भाग म्हणून मशालने देहू-पंढरपूर व आळंदी-पंढरपूर या पालखी मार्गांचे त्रिमितीय मॉडेल्स बनवली. सदर मॉडेल्स ३० डिसेंबर २०२१ रोजी देहू देवस्थान व आळंदी संस्थान यांच्या पदाधिकाऱ्यांना पुणे जिल्हा विभागीय आयुक्त कार्यालयातील पिल्ग्रिमेज विभागाचे प्रमुख श्री. राजेश तितर यांचे हस्ते समारंभपूर्वक हस्तांतरित करण्यात आली. दोन्ही मॉडेल्स देहू व आळंदीच्या मंदिरांत भाविकांना दिसावीत अशी सोय केली जाईल. याच संशोधनावर आधारित काही पॅनेल्स तयार करून ती यावेळी प्रदर्शित करण्यात आली.




प्रदर्शनादरम्यान पालखी मार्गांच्या त्रिमितीय मॉडेल्सवर चर्चा करताना देहू देवस्थानचे पदाधिकारी







**पालखी मार्गांची मॉडेल्स**

या संशोधनाबरोबरच पालखी मार्गांवरील गावांत वारीदरम्यान कोणत्या प्रकारचे प्रशासकीय तसेच स्वच्छता, निवारा, पाणी इत्यादींसंबंधीच्या समस्या गावकऱ्यांना व वारकऱ्यांना भेडसावतात ते जाणून घेण्यासाठी दोन्ही पालखी मार्गांवरील निवडक ९ गावांमध्ये एक रॅपिड असेसमेंट सर्व्हे (जलद मुल्यांकन सर्व्हेक्षण) केले गेले.

| पालखी सोहळा मार्ग | निवडण्यात आलेली गावे |
|---|---|
| संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा | तरडगाव, बरड, माळशिरस आणि वेळापूर |
| संत तुकाराम महाराज पालखी सोहळा | बारामती, अंथुर्णे, सराटी आणि पिराची कुरोली |
| पंढरपुरात दाखल होण्याअगोदर सर्व संतांच्या पालख्या वाखरी या गावी एकत्र येतात | |

वारकरी ग्रामस्थांच्या घरी मुक्काम करतात तसेच ग्रामस्थ पंगती घालतात त्यामुळे असे उपक्रम राबवावेत जेणेकरून वारकरी तसेच ग्रामस्थ या दोहोंना फायदा व्हायला हवा. सोहळ्यादरम्यान होणारी आरोग्याची व स्वच्छतेची हेळसांड सहन करून बरेचसे सर्वसामान्य ग्रामस्थ भक्तिभावाने वारकऱ्यांची सेवा करतात. हे आपले सांस्कृतिक व सामाजिक संचित आहे. रॅपिड असेसमेंट सर्व्हेवरून असे दिसून आले की सोहळ्याच्या मार्गावरील गावांमध्ये पायाभूत सुविधांची उपलब्धतता तसेच त्यांचे परिणामकारक व्यवस्थापन, वारकरी आणि ग्रामस्थ या दोन्ही गटांसाठी अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळेच खालील उपक्रम राबविण्याचा मशालचा मानस आहे:

1. गावांचे जिओ-स्पॅशिअल मॅपिंग करणे
2. गावांमधील कचऱ्याचे शास्त्रशुध्द व्यवस्थापन करणे
3. गावातील रस्ते प्रिस्ट्रेसड प्रिकास्ट कॉंक्रीट पेव्हमेंटने बनवणे

गावांतील स्वच्छता राखून ग्रामस्थांच्या आरोग्यात सुधारणा घडवून आणणे, पालखी मुक्कामाच्या काळात वारकऱ्यांना विविध सुविधा पुरवणे तसेच निसर्गसंवर्धन करणे हा या उपक्रमांचा हेतू असेल आणि खालील उद्दिष्टे असतील:

अ. गावांचा सर्वांगीण विकास सुलभरित्या व्हावा यासाठी पायारभूत आराखडा तयार करणे
आ. गावांमध्ये घनकचरा व्यवस्थापनाची व्यवस्था सुरु करणे
इ. गावांमध्ये प्रिस्ट्रेसड प्रिकास्ट कॉंक्रीट पेव्हमेंट बसवणे

***पथदर्शक प्रकल्प म्हणून बरड आणि पिराची कुरोली या दोन गावांमध्ये हे उपक्रम राबवण्याच्या दृष्टीने मशालचे नियोजन सुरु आहे***

**जलरोजनिशी प्रकल्प**

जर्मनीस्थित हेल्म्होलटझ-झेन्त्रम फर उम्वेल्टफॉरस्झुंग GmbH (UFZ) या संशोधन संस्थेच्या सहयोगाने जलरोजनिशी प्रकल्प राबविण्यात आला. पुणे शहरातील झोपडपट्ट्यांमधील पाण्याची परिस्थिती व स्थलांतर व्यवस्थित समजून घेण्यासाठी एक सर्वेक्षण हाती घेण्यात आले.

या झोपडपट्ट्यांत राहणाऱ्या नागरिकांची पाण्याची गरज ओळखणे आणि त्यानुसार पाणी पुरवठ्याच्या व्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी सूचना देणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश होता. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात घरांचे प्रकार व त्यांना होणाऱ्या पाणीपुरवठ्याची पद्धत समजून घेण्यासाठी पुण्यातील चार वेगवेगळया वस्त्यांमधील पन्नास घरांचे सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण करण्यात आले. दुसऱ्या टप्प्यात या घरांना पाण्याचे संकलन, त्याचा वापर तसेच त्याची गुणवत्ता यांच्या नोंदींसाठी एक आठवडाभर रोज जलरोजनिशी भरण्यास सांगितले गेले.

## CORE लसीकरण मोहीम

CORE (Community Organized Relief Effort) ही अमेरिकास्थित आपत्कालीन परिस्थितीमध्ये बचावकार्य करणारी संस्था आहे. या संस्थेच्या सहयोगाने मशालने कोव्हिड लसीकरण मोहीम आयोजित केली होती. पुणे महानगरपालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या लसीकरणाचा लाभ घ्यावा यासाठी झोपडपट्टीतील रहिवाशांचे प्रबोधन करणे व त्यांना प्रोत्साहित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. सदर उपक्रमांतर्गत लसीकरण करण्यासाठी आम्ही हडपसर प्रभागातील ३६ झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या १०,००० रहिवाशांपर्यंत पोहोचलो. ही मोहीम ३१ जुलै २०२१ ला सुरु झाली आणि लसीकरणाचे केंद्र हडपसरमधील विल्लो पूनावाला धर्मादाय इस्पितळ हे होते.



**COWIN पोर्टलवर रहिवाशांची नोंदणी करणे आणि लसीकरण केंद्रावर जाऊन लस घेण्यासाठी त्यांना चलन देणे यासाठी प्रत्येक घराला भेटी देण्यात आल्या.**

**लाभार्थ्यांसाठी घर ते लसीकरण केंद्र अशी जाण्यायेण्याची व्यवस्था मोफत करण्यात आली होती.**

## कोव्हिड मदत कार्य 2.0

मशाल व CORE यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु झालेल्या 'कोव्हिड अनुरूप व्यवहार' या प्रकल्पांतर्गत 'मशाल कोव्हिड मदत कार्य २.०' हा उपक्रम प्रायोगिक तत्वावर आयोजित करण्यात आला होता.

**उद्दिष्टे:**

1. स्थानिक स्वयंसेवकांना प्रकल्प योग्य प्रकारे समजावून सांगणे.
2. स्थानिक स्वयंसेवक वैद्यकीय सुरक्षा किट (कोरोना कवच) वाटपासाठी प्रत्येक घराला भेट देणार असल्याने त्यांचे या किटविषयी प्रबोधन करणे.
3. कोव्हिड महामारीच्या व्यवस्थापनाविषयी झोपडपट्टीवासियांना आवश्यक ती मदत पुरवणे.

मशालने १०,००० कोरोना कवच तयार करून ज्या भागांत कोव्हिडचा प्रसार तुलनेने अधिक आहे जसे की हडपसर प्रभाग, जनता वसाहत आणि वेश्यावस्त्या या ठिकाणी त्यांचे वाटप केले.

कोरोना कवच
वाटप कार्यक्रम





**कोरोना कवचमध्ये ऑक्सिमीटर, थर्मोमीटर आणि अन्य १२ आवश्यक वैद्यकीय घटक समाविष्ट होते.**

# ग्लोबल ऑपोर्च्युनिटी युथ नेटवर्क (GOYN)

पुणे महानगरपालिकेच्या प्रभागस्तरीय सर्वेक्षणाला जिओ टॅगिंग करणे हा या प्रकल्पाचा मुख्य हेतू होता. लोकसमूहांना भेडसावणाऱ्या अडचणींवर योजनाबद्ध उपाय शोधताना वस्तुस्थितीचा ठोस आधार असलेला डेटा खूप उपयोगी पडतो यावर ग्लोबल ऑपोर्च्युनिटी युथ नेटवर्क (GOYN)चा विश्वास आहे. व्यवस्थापकीय फायद्यांसाठी मशालने GOYN सोबत नकाशे आणि GIS integration technology चे उपयोग यांवर चर्चा सुरु केल्या. या चर्चांची फलनिष्पत्ती म्हणून मशालने GOYN बरोबर कार्यरत असणाऱ्या शहरभर विखुरलेल्या ३००० केंद्रांचे नकाशे तयार करून त्यांना प्रभागनिहाय स्वतंत्र नकाशांच्या रुपात सादर केले. यानंतर, उपजीविकेसाठी आधार शोधणाऱ्या तरुणाईचे सर्वेक्षण करण्यासाठी मशाल व GOYN ने एकत्रित काम सुरु केले. मशालने पुणे महानगरपालिकेच्या १४ प्रभागांमध्ये अशा प्रकारची ७५०० सर्वेक्षणं पूर्ण केली. नंतर या सर्वेक्षणातील माहितीवर GOYN ने संस्करण केले व जिओ टॅगिंगच्या पुढील कामासाठी मशालला हस्तांतरित केले.

***मशाल व GOYN अधिकारी चर्चा करताना***





## गृहनिर्माण सहाय्य सेवा

सदर प्रकल्प अन्नपूर्णा मायक्रोफायनान्स इन्स्टीट्युशन आणि हॅबिटॅट फॉर ह्युमॅनिटी यांच्या सहयोगाने राबविण्यात आला. पुण्यातील झोपडपट्ट्यांमधील असंघटीत वस्त्यांपैकी जिथे जिथे अन्नपूर्णा परिवार कार्यरत असेल तिथे गृहनिर्माण सहाय्य सेवांच्या सुविधा पुरवणे हा या प्रकल्पाचा हेतू होता.

**उद्दिष्टे:**

1. प्रधान मंत्री आवास योजना मिळविण्यासाठी प्रोत्साहनपर गटबंधन करणे.
2. कमी उत्पन्न असलेल्या समुदायंना गृहनिर्माण आणि उपजीविकेसंदर्भातील उपक्रमांसाठी वित्तीय सहाय्य मिळवून देण्यासाठी मदत करणे.
3. राहणीमान व प्रतिष्ठा उंचवावी यासाठी गृहनिर्माणात सुधारणा कराव्यात तसेच नवीन घरांच्या एकगठ्ठा बांधकामासाठी तांत्रिक साहाय्य पुरवावे.
4. सुरुवातीची १०० घरे बांधण्यासाठी कृती आधारित संशोधन करणे ज्याचा उपयोग प्रत्यक्ष बांधकामासाठी तसेच गृहनिर्माण धोरणनिश्चितीसाठी होईल.

अन्नपूर्णा परिवाराच्या ७५०० सदस्य कुटुंबांना आधार देण्यासाठी पुण्यातील गृहनिर्माण सहाय्य प्रकल्पाचा विस्तार करण्याची गरज असली तरीही खर्चाची पूर्तता करण्यासाठी शाश्वत महसूल निर्मितीचे नियोजन करावे लागेल.

## उपजीविका प्रकल्प

सामाजिक व आर्थिकदृष्ट्या वंचित कुटुंबांच्या आयुष्यात ठोस बदल घडवून आणण्याच्या दिशेने हॅबिटॅट फॉर ह्युमॅनिटी सामुदायिक, सार्वजनिक, खाजगी आणि नागरी क्षेत्रांत कार्यरत आहे. सदर प्रकल्प मुख्यत्वेकरून महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात आला होता आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी मशालने हातभार लावला होता.

**हेतू:** कोव्हिड-१९ च्या महामारीदरम्यान उद्धवलेल्या बेरोजगारीवर मात करण्यासाठी तसेच या महामारीचा यशस्वीरित्या सामना करण्यासाठी उत्पन्नाचे शाश्वत मार्ग शोधून महिला सक्षमीकरण घडवून आणणे.

**उद्दिष्टे:**

- बेरोजगार महिलांची आर्थिक स्थिती सुधारावी तसेच त्यांच्या उत्पन्नात भर पडावी यासाठी त्यांना विविध क्षेत्रांतील जसे की शिलाईकाम, ब्युटी पार्लर, भाजी विक्री इ. प्रशिक्षण देणे
- ऑनलाईन माध्यमांतून महिलांना वित्तीय तसेच डिजिटल साक्षरतेचे प्रशिक्षण देणे
- सदर महिलांना कायदेविषयक ज्ञान देणे
- सदर महिलांना मानसिक आरोग्याबद्दल जागरूक बनवणे
- लॉकडाऊनच्या काळात मासिक पाळीदरम्यान स्वच्छता कशी राखावी याविषयी मुली व महिलांचे प्रबोधन करणे
- कोव्हिड-१९ च्या महामारीदरम्यान स्वच्छता राखून सुरक्षित कसे राहावे याविषयी जनजागृती करणे



हॅबिटॅट फॉर ह्युमॅनिटीच्या सहयोगाने आयोजित करण्यात आलेल्या उपजीविका प्रकल्पांतर्गत प्रशिक्षण देताना





खालील वस्त्यांमध्ये उपक्रम राबविण्यात आला:

1. अजंठानगर
2. वेताळबाबा
3. चाफेकर चौक
4. राजीवगांधी नगर
5. शांतीनगर झोपडपट्टी
6. हिराबाई लांघे चाळ

## सर्वांगीण विकासासाठी समृद्धी प्रकल्प

सर्वांगीण विकासासाठी समृद्धी प्रकल्प हा जॉन डीअर कॉर्पोरेट सोशल रिस्पोन्सिबिलिटीचा उपक्रम होता. याद्वारे जागतिक पातळीवरील समस्या जसे की उपासमार, शिक्षणाचा अभाव आणि सामुदायिक विकासातील अडचणी इत्यादींवर उपाय शोधून काढायचे होते. क्षेत्र अभ्यास करण्यासाठी मशाल, Cohesion Foundation आणि Labournet यांच्या मदतीने The Centre for Advanced Research & Development (CARD) यांनी हा उपक्रम राबविला.

**उद्देश:** लाभार्थ्यांची सामाजिक व आर्थिक परिस्थितीत शाश्वत सुधारणा घडवून आणणे

**हेतू:** पाणी व स्वच्छतेच्या सार्वजनिक पायाभूत सुविधांचा स्तर उंचावून तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न दुपटीने वाढवून दर्जेदार शिक्षण व आर्थिक संधी सुनिश्चित करण्यासाठी समुदायाची सामाजिक व आर्थिक परिस्थिती सुधारणे

**उद्दिष्टे:**

1. पिण्यासाठी सुरक्षित पाण्याची उपलब्धता आणि स्वच्छता याद्वारे गुणवत्ता-जीवन निर्देशांकात सुधारणा करणे
2. शेतीची उत्पादकता एकरी १५% ने वाढवणे तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न दरवर्षी १५% ते २०% ने वाढवणे
3. प्रकल्पांतर्गत येणाऱ्या सरकारी शाळांतील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ करणे
4. तरुणांची व्यावसायिक कौशल्ये तसेच त्यांची रोजगारक्षमता यांत वाढ करणे

**राबविण्यात आलेले उपक्रम:**

I. दुसऱ्या क्रमांकाच्या म्हणजेच शेतीच्या उद्दिष्टावर काम न करता एकूण बजेटपैकी ६५% निधी तिसऱ्या क्रमांकाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी खर्च करण्यात आला.

II. क्रमांक तीनचा उपक्रम राबविण्यासाठी प्रकल्पांतर्गत येणाऱ्या सहा झोपडपट्ट्यांमधील वय वर्षे ६ ते १६ मधील विद्यार्थ्यांसाठी तसेच इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांसाठी ज्यादाचे वर्ग घेण्यासाठी पंधरा शिक्षकांची नियुक्ती केली गेली. संगणकाचे मुलभूत ज्ञान शिकवण्याकरिता संगणक शिकवणाऱ्या शिक्षकांना नियुक्त केले गेले. सरकारी शाळांतील विद्यार्थ्यांचे इंग्लिश आणि गणित सुधारण्यासाठी अतिरिक्त शिक्षकांची नियुक्ती केली.

III. प्रकल्पांतर्गत नूतनीकरण केलेल्या पायाभूत सुविधा शाबूत ठेवण्यासाठी तसेच लोकसहभाग वाढवण्यासाठी खालील प्रकारच्या उपाययोजना राबविण्यात आल्या:
   1. स्वच्छता समित्यांचे गठन
   2. स्वच्छता समित्यांची क्षमता उंचावण्यासाठी विविध उपक्रम
   3. आरोग्य आणि स्वच्छता यांविषयी जनजागृती शिबीर
   4. सार्वजनिक स्वच्छतागृहांची देखभाल करण्यासंबंधातील उपक्रम

IV. अभ्यासक्रमाबाहेरील अनौपचारिक उपक्रम, कृतीतून विज्ञान, शिष्यवृत्तीद्वारे पाठिंबा, मूल्यशिक्षणासंबंधी जागृती, संगणक साक्षरता समितीचे गठन, मूलभूत संगणक शिक्षण प्रशिक्षण, शैक्षणिक किट्स, ग्रंथालय, स्व-अध्ययन सुधारणा तंत्राचे वर्ग, करिअर मार्गदर्शन सत्र, वैयक्तिक स्वच्छता वर्ग, किशोरवयीन मुलींसाठी जीवन कौशल्ये प्रशिक्षण इ. उपक्रमदेखील राबविण्यात आले.

V. झोपडपट्टीतील उमेदवारांची ब्युटी पार्लर, किरकोळ विक्री सहयोगी, शिलाईकाम, टॅली व जीएसटी, कार्यालयीन सहाय्यक, कॉम्प्युटर हार्डवेअर व नेटवर्किंग, चार-चाकी चालवण्याचे प्रशिक्षण यांसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नोंदणी केली.





चार-चाकी चालक प्रशिक्षण आणि कॉम्प्युटर हार्डवेअर प्रशिक्षण वर्ग

## हकदर्शक एम्पॉवरमेंट सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड (HESPL)

नागरिकांसाठी विविध कल्याणकारी योजना शोधणे व अर्ज करणे हे अधिकाधिक सुलभ व्हावे आणि त्यांना शासकीय तसेच खाजगी योजनांचे लाभ घेता यावेत यासाठी HESPL संस्था क्लाऊडवर आधारित मोबाईल फोनद्वारे वापरता येईल असे बहु-राज्यिक व बहु-भाषिक व्यासपीठ बनवत आहे. ग्रामीण व शहरी भागांतील लाभार्थ्यांसाठी लागू असणाऱ्या कल्याणकारी योजनांना डिजीटाइज करणारा व त्यांच्या अर्ज भरण्याच्या प्रक्रिया सोप्या करणारा हा पहिलावहिला उपक्रम आहे.

**हेतू:** समाजातील विविध घटकांना आवश्यक त्या सुविधा पुरवण्यासाठी तरुणांना प्रशिक्षित करणे.

**उद्दिष्टे:**

1. आपण कोणत्या योजनांसाठी पात्र आहोत हे नागरिकांना समजावून सांगण्यासाठी तरुणांना प्रशिक्षण देणे
2. लाभार्थ्यांना त्यांचे लाभ मिळवून देण्यासाठी शेवटपर्यंत मदत पुरवणे

**कार्यपद्धती:**

1. ‘हकदर्शक’ म्हणून प्रशिक्षण देण्यासाठी मशालने पुणे महानगर प्राधिकरणाबाहेर स्थायिक असलेल्या १५ तरुण-तरुणींची निवड केली.
2. या निवड करण्यात आलेल्या तरुण-तरुणींना HESPL ने प्रशिक्षण दिले.

***सदर प्रकल्प शाश्वतरीत्या चालू राहावा यासाठी आवश्यक महसूल निर्माण होणे गरजेचे आहे***

## PMAY-G (प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण)

सदर प्रकल्प INHAF साठी राबविण्यात आला. यात पाच ग्रामपंचायती आणि पंच्याहत्तर कुटुंबांचा [पाच गावांतील तीन प्रकारांच्या योजनांतील (प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, राज्यशासन योजना व लाभार्थ्याने पुढाकार घेऊन बांधलेली) प्रत्येकी पाच कुटुंबे] सर्व्हे करण्यात आला. ग्रामीण घरांच्या स्थानिकीकरणाची माहिती गोळा करणे हा या सर्वेक्षणाचा हेतू होता.

| अ.क्र. | गावाचे / ग्रामपंचायतीचे नाव | घरांची संख्या | | | घरांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण | राज्य शासनाची योजना | लाभार्थ्याने पुढाकार घेऊन बांधलेली घरे | |
| 1 | वाखरी | 4 | 5 | 6 | 15 |
| 2 | वेळापूर | 5 | 6 | 4 | 15 |
| 3 | सराटी | 5 | 7 | 3 | 15 |
| 4 | बरड | 5 | 6 | 4 | 15 |
| 5 | अंथुर्णे | 4 | 6 | 5 | 15 |
| **6** | **एकूण** | **23** | **30** | **22** | **75** |

**उद्दिष्टे:**

1. योजनांचे एकक, प्रक्रिया, वितरण प्रणाली व नागरिकांसाठी असलेला सामाजिक पैलू यांसंदर्भात उपरोक्त तिन्ही योजनांचे मूल्यवर्धन (या योजना लाभार्थ्यांना पुऱ्या पडतात का, लाभार्थ्यांची समाधानाची पातळी व लाभार्थ्यांची योजनांबद्दलची समज) समजून घेणे.
2. ग्रामीण गृहनिर्माण प्रकल्प यशस्वी अथवा अयशस्वी होण्यास कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे (वितरण, प्रशासन व प्रकल्पाची रचना यांमुळे होणारे सामाजिक व आर्थिक परिणाम).

निरीक्षण, औपचारिक व अनौपचारिक चर्चा, छायाचित्रे व रेखाकृत चित्रे यांद्वारे घरांचे व वस्त्यांचे दस्तऐवजीकरण केले गेले. प्रत्यक्ष क्षेत्रभेटीसाठी परिवर्तन ही सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण करणारी संस्था नियुक्त केली होती.

## तृतीयपंथीयांचे सक्षमीकरण

मशालने सदर प्रकल्प ग्लोबल राईट्स फाउंडेशन व गिव्हिंग सर्कल यांच्यासमवेत राबविला. ग्लोबल राईट्स फाउंडेशन ही संस्था ठाणे जिल्ह्यातील तृतीयपंथीयांच्या पुनर्वसनाच्या कार्यात सक्रिय आहे. संस्थेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

1. विविध कार्यक्रम, समाजमाध्यमांवरील मोहिमा आणि वेबसाईट्स या माध्यमांद्वारे सर्वसामान्य नागरिकांमध्ये तृतीयपंथीयांबद्दल जागरूकता आणि संवेदनशीलता वाढवणे
2. सामान्य नागरिक, कोर्पोरेट तसेच वेगवेगळया संस्था यांद्वारे निवारागृह, सामोपचार केंद्र, दवाखाना यांसारख्या पूर्वनियोजित कार्यक्रमासाठी निधी उभारणे

वेबसाईट, लिंक्डइन, युट्युब, इन्स्टाग्राम व फेसबुक यांसारख्या डिजिटल माध्यमांवर ‘आय एम ट्रान्स’ हे शीर्षक वापरून तृतीयपंथीयांसाठी हक्काचे व्यासपीठ निर्माण केले गेले.

उल्हासनगर येथे ‘खाना चाहिये’ यांच्या सहकार्याने समाज-स्वयंपाकघर सुरु करण्यात आले




‘वात्सल्य ट्रस्ट’ च्या सहयोगाने रिक्षाचालक, ब्युटीशिअन आणि संगणकाचे मूलभूत ज्ञान या विषयांसाठी कौशल्य विकास कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या.

**इंटर्नशिप्स**

'मशाल' विद्यार्थ्यांना इंटर्नशिप करण्यास संधी देते. यावेळी त्यांना प्रकल्पाचे प्रस्ताव लिहिणे, क्षेत्रभेट देऊन माहिती गोळा करणे, या माहितीचे विश्लेषण करणे, अहवाल लिहिणे यांसारख्या जबाबदाऱ्या दिल्या जातात. विविध महाविद्यालये व विद्यापीठांतील विद्यार्थी 'मशाल'मध्ये इंटर्नशिप करण्यासाठी उत्सुक असतात.


इंटर्नशिपदरम्यान विद्यार्थ्यांना विविध कृतीभिमुख प्रकल्पांवर काम करण्याची संधी मिळते जसे की -

स्लम अॅटलास
पॉव्हर्टी मॅपिंग
आर्थिकदृष्ट्या परवडणारी घरे
स्मार्ट सिटी बुक
झोपडपट्टी स्वच्छता प्रकल्प
शहर व प्रादेशिक नियोजन
सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण
पायाभूत सुविधांचा विकास
भूजलसाठा माहिती
पर्यावरणीय व व्यवस्थापकीय सेवा
प्रधानमंत्री आवास योजना
सामाजिक सेवा योजना जसे की आधार कार्ड, रेशन कार्ड, इ.
समूह विकास
क्षमता बांधणी व तांत्रिक सेवा तरतूद

या संस्थांमधील विद्यार्थी 'मशाल'मध्ये इंटर्नशिप करण्यासाठी येतात-

युनिव्हर्सिटी ऑफ एडिंबर्ग
अमेरिकन युनिव्हर्सिटी अलायन्स फॉर ग्लोबल एज्युकेशन
जिंदाल स्कूल ऑफ इंटरनॅशनल अफेअर्स
आयआयटी मुंबई
फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे
इमोरी कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सेस, बिझीनेसेस अँड ईकॉनॉमिक्स, मॅनेजमेंट, अटलांटा, युएसए
टाटा इन्स्टीट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (TISS)
आयएलएस लॉ कॉलेज, पुणे
आयोजन स्कूल ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईन, पुणे
प्रियदर्शनी स्कूल ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईन स्टडीज्, नागपूर
स्कूल ऑफ प्लॅनिंग अँड आर्किटेक्चर, नवी दिल्ली
कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे
सिंबायोसिस लॉ स्कूल, पुणे


## संस्थात्मक संरचना




## व्यवस्थापकीय समिती

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| 1 | श्रीमती नीता पवार-चाळके | अध्यक्ष |
| 2 | श्री. शंकर रामनाथन | खजिनदार |
| 3 | श्री. दीपक विश्वनाथन | कार्यकारी संचालक |
| 4 | डॉ. सुहास पळशीकर | सदस्य |
| 5 | प्रा. विद्याधर फाटक | सदस्य |
| 6 | प्रा. बाणश्री बनर्जी | सदस्य |
| 7 | श्री. सुहास लुंकड | सदस्य |
| 8 | श्री. विनायक परब | सदस्य |
| 9 | डॉ. शिरीष प्रयाग | सदस्य |
| 10 | श्री. निलेश कुलकर्णी | सदस्य |

## अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल



M/S PAWADE POKHARKAR & ASSOCIATES
CHARTERDED ACCOUNTANTS
Mobile No. 8830305380 Email: caanilpawade@gmail.com

**Basis of opinion**

We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our audit opinion on the financial statements.

We have obtained all the information and explanation which to the best of my knowledge and belief were necessary for the purpose of our audit. The Balance Sheet and the Income and Expenditure account are in agreement with the books of account.

**Opinion**

In our opinion and to the best of our information and explanation given to us:

i) Proper books of accounts have been kept by the trust.
ii) The accounts subject to and read with the notes thereon give information required,
iii) Balance Sheet gives true and fair view of the state affairs of the trust as at 31st March 2021.
iv) Income and Expenditure account gives a true and fair view of the **Deficit** for the year ended on that date.

For, Pawade Pokharkar & Associates,
Chartered Accountants,
Firm Reg. No 142790W,

CA Anil Kashinath Pawade,
M. No. 172061
Place: Pune
Dated: 28/12/2021
UDIN: 21172061AAAAGS7571

Office No.234,2nd Floor, Akshay Complex, DP Road, Near Dhole Patil Kshatriya karyalay, Pune Station, Pune-411001.

*एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ ची बॅलन्स शीट मागणीनुसार उपलब्ध करून दिली जाईल*

## श्रद्धांजली

### श्री. अशोक कुलकर्णी

श्री. अशोक कुलकर्णी यांनी हयातभर शिक्षण, काम, वैयक्तिक आयुष्य यांसारखे जीवनातील विविध कप्पे कटाक्षाने परंतु तरीही अगदी सहजतेने स्वतंत्र ठेवले. बेळगावात घालवलेल्या त्यांच्या सुरुवातीच्या वर्षांचा प्रभाव त्यांनी घेतलेले निर्णय आणि जोपासलेल्या आवडी यांवर दिसून येतो. ते 'मशाल'चा सर्वात खंबीर आधार होते. त्यांनी कायमच पडद्यामागे राहणे पसंत केले. परंतु प्रकल्पांच्या प्रगतीवर व संस्थेच्या कामकाजावर त्यांचा प्रभाव कायमच असायचा. ते स्वभावतःच मार्गदर्शक होते आणि त्यांच्याकडे दूरदृष्टीदेखील निसर्गतःच होती. या दोन वैशिष्ट्यांमुळे नवोदित कलाकार आणि व्यावसायिक या दोन्ही गटांमध्ये त्यांचा लीलया वावर असायचा. त्यांचा सच्चेपणा, प्रेमळ व्यक्तिमत्व आणि शहाणपण यांसाठी आम्हाला त्यांची आठवण सदैव येत राहील.

'मशाल'चा उपाध्यक्ष या नात्याने त्यांनी संस्थेची सूत्र अत्यंत खडतर कालावधीत हाती घेतली होती. त्यांनी 'मशाल'ला दिलेल्या निःस्वार्थी सेवेबद्दल व्यवस्थापकीय परिषदेचे सदस्य आणि संस्थेचे कर्मचारी यांच्यावतीने त्यांना मनस्वी सलाम.

### श्री. शरद महाजन

एकाच वेळी विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये सहज वावरणारी माणसं फार दुर्मिळ असतात. शरद महाजन अशा माणसांपैकी एक होते. त्यांना विकासक्षेत्रातील असलेल्या स्थापत्यशास्त्रीय ज्ञानाच्या व नियोजनाच्या बळावरच 'मशाल'ने व्यापक आवाका असलेले प्रकल्प हाती घेतले. त्यांनी स्वतःला 'मशाल'साठी समर्पित केले होते असे म्हणणे आतिशयोक्ती ठरणार नाही. त्यांची सर्वसमावेशकतेबाबतची संवेदनशीलता अफाट होती आणि त्यासाठी ते अथक कार्यमग्न असायचे. उपेक्षितांच्या म्हणण्याची दखल घेतली जावी आणि त्यांचा विकासकामांत समावेश केला जावा यांवर त्यांचा कायमच भर असायचा. त्यांच्या याच भूमिकेचे पडसाद 'मशाल'च्या प्रत्येक प्रकल्पात उमटलेले दिसतात. संघबांधणी आणि सांघिक प्रयत्न याबाबत ते आग्रही असायचे. त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व आणि विविध क्षेत्रांत विहरणारी समृद्ध प्रतिभा यांमुळे 'मशाल'चा मित्रपरिवार वाढतच गेला.

त्यांच्याविषयी बोलताना शब्द कमी पडतील. त्यांच्या आकस्मिक निधनामुळे आमचे किती पातळयांवर आणि किती खोलवर नुकसान झालंय हे शब्दांत नाही मांडता येणार. मात्र 'मशाल' सदैव आर्थिक व सामाजिकदृष्ट्या वंचित गटांच्या उत्थानासाठी कार्यरत असेल आणि त्यातूनच सरांच्या स्मृती जपल्या जातील आणि हीच त्यांना आपली खरी श्रद्धांजली ठरेल.

# वर्तमानपत्रांतील प्रसिद्धी



परवडणाऱ्या घरांसाठी अडथळ्यांची शर्यत

'म्हाडा'चे अध्यक्ष अंकुश काकडे यांचा आरोप



झोपडपट्टी योजनेतील घरे विकू नये : पाठक



पुढारी

४८६ झोपडपट्ट्यांचे होणार ड्रोनद्वारे सर्वेक्षण

मशाल स्वयंसेवी संस्थेचा पुढाकार



DNA PUNE

NGO comes up with unique slum atlas



नागपूर चाळ व गांधीनगरला घरकुल योजना

'बीएसयूपी' योजनेअंतर्गत राज्यात प्रथमच शहरी गरिबांसाठी घरे बांधली जाणार



सकाळ

स्मार्ट सिटी प्रकल्पाबाबत ६२ टक्के पुणेकर अनभिज्ञ

महाराष्ट्र सोशल हाउसिंग ॲण्ड ॲक्शन लिग संस्थेच्या सर्वेक्षणातील निष्कर्ष



महाराष्ट्र टाइम्स


पुणे



सकाळ

नकाशांतून मिळेल झोपड्यांची सर्वंकष माहिती

...झोपड्यांची सर्वंकष माहिती



THE TIMES OF INDIA, PUNE

32.5 pc population of city lives in slums



केसरी



HELLO लोकमत



रविवार लोकसत्ता

आर्थिक सक्षमतेचे 'मांडे' मनात नव्हे, प्रत्यक्षात!




'मशाल'मुळे मिळाला रोजगार आणि आत्मसन्मानही

लॉकडाऊनमध्ये रोजगार गमावून बसलेल्या आणि नव्याने रोजगार शोधू पाहणाऱ्या महिलांना 'मशाल'च्या प्रकल्पामुळे रोजगाराचा नवा मार्ग मिळाला. प्रत्येक वस्तीमध्ये असे उपक्रम राबवले जाऊ शकतात.

कोविडच्या पहिल्या लाटेत, म्हणजे मार्च २०२० ते जुलै २०२० या काळात कामगार वर्गाचे अतोनात हाल झाले. अनेकांना आपला रोजगार गमवावा लागला. जुलैनंतर कोविडचं वातावरण निवळतंय असं वाटत असतानाच मार्च २०२१मध्ये पुन्हा लॉकडाऊन लावावा लागला. लॉकडाऊन आणि निर्बंधांमुळे हातावर पोट असलेल्यांचा रोजगार बुडाल्यानंतर अनेकांनी गावची वाट धरली. शहरातल्या कामगारांनी मात्र संस्थांकडून, लोकांकडून मिळणाऱ्या अन्नधान्याच्या मदतीवरच आपलं पोट भरलं. घरातल्या पुरुषांसोबतच महिलांचंही काम सुटलं होतं. अशा महिलांना रोजगार मिळवून देण्यासाठी 'मशाल' संस्थेने उपाय शोधून काढला.

## ‘मशाल’ संबंधी

‘मशाल’ची स्थापना १९८५ साली पुण्यात झाली. ‘मशाल’ मुख्यत्वे शहरी तसेच ग्रामीण भागांतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विशेषतः गृहनिर्माण, निवासी वातावरण, उपजीविका आणि जीवनाचा दर्जा या क्षेत्रांमध्ये काम करते. सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण, दारिद्र्याचे मॅपिंग, सामाजिक विकास कार्यक्रम, शहरी व प्रादेशिक नियोजन, पर्यावरणीय व व्यवस्थापकीय सेवा, वंचित घटकांसाठी क्षमता बांधणी व विकास कामांसाठी विविध तांत्रिक सेवांचा पुरवठा या क्षेत्रांमधील कामांचा संस्थेला प्रदीर्घ अनुभव आहे. ‘सार्वजनिक मालकी’ या तत्वाला अनुसरून ‘मशाल’ने आतापर्यंत काम केले आहे आणि यापुढेही संस्था याच तत्वाशी एकनिष्ठ असेल.







Earthquake affected people rehabilitated in new pakka house

Area sabha to identify beneficiaries

The Chief minister of maharashtra launched the slum Atlas Pune

लोकसहभागातून समाजाचा विकास करणे हे आमचे ध्येय आहे

मूलभूत मानवी हक्क म्हणून पुरेसा निवारा आणि विविध सोयींनी युक्त असे निरोगी निवासी वातावरण प्रदान करणे हे आमचे उद्दिष्ट आहे

MASHAL
**Maharashtra Social Housing and Action League**
C-5 Malati Co.op.Hsg Society,Senapati Bapat Road
Near Sahara Hotel ,Pune - 411016
Tel -020 25653566 Email id -mashalngo@gmail.com